IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

# प्रमाणभाषा व बोलीभाषेचा सोशलमिडिया माध्यमातून उपक्रमशील वापर : काळाची गरज

**डॉ. नम्रता लक्ष्मण हत्तळगे.**
मराठी विभाग, विलिंग्डन महाविद्यालय सांगली (स्वायत्त)
knamrata121082@gmail.com

**सारांश** (Abstract) *: पूर्वीच्या काळी संदेश पाठवण्यासाठी आणि संपर्कासाठी पक्षांचा उदा. कबुतरांचा उपयोग केला जात असे. दळणवळणासाठी घोडे, उंट आणि दूतांचा वापर केला जात असे. त्यानंतर पत्राद्वारे संवाद साधला जाऊ लागला. परंतु, आधुनिक काळात संपर्काची पद्धत पूर्णपणे बदलली आहे. आता एका सेकंदाचाही विलंब न लावता आपण जगाशी जोडू शकतो. जगातील कोणत्याही व्यक्तीशी संपर्क साधू शकतो, अगदी ती व्यक्ती ज्या अवस्थेत आहे तसे तिला समोर पाहू शकतो आणि संवाद साधू शकतो. आधुनिक युगातील प्रभावी संवाद साधन म्हणून सोशल मीडियाचा उपयोग होत आहे.संवादाविषयी डॉ. आर. पी. सक्सेना म्हणतात की, "संवाद ही एक संस्कृतीशी संबंधित प्रकिया आहे ज्यात संवाद साधणारा (संप्रेषक) यादृच्छिक मौखिक आणि अमौखिक चिन्हांचा वापर करून आपले विचार, भावना, दृष्टिकोण, माहिती श्रोत्याकडे संप्रेषित करीत असतो आणि त्याचप्रकारचा प्रतिसाद श्रोत्याकडून ग्रहण करीत असतो." म्हणजेच असे म्हणता येईल की, संवाद ही एक कला आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. यात एखादी व्यक्ती (संप्रेषक) आपले विचार, मनातल्या भावना, माहिती किंवा स्वतःचा दृष्टिकोन दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचवते.*

**की - वर्ड** : 'ओल हरवलेली माती' कथासंग्रहातील आधुनिक शहरीवास्तव आणि मानवी एकाकीपण प्रमाणभाषा व बोलीभाषेचा सोशलमिडिया माध्यमातून उपक्रमशील वापर : काळाची गरज

## I. प्रस्तावना :

पूर्वीच्या काळी संदेश पाठवण्यासाठी आणि संपर्कासाठी पक्षांचा उदा. कबुतरांचा उपयोग केला जात असे. दळणवळणासाठी घोडे, उंट आणि दूतांचा वापर केला जात असे. त्यानंतर पत्राद्वारे संवाद साधला जाऊ लागला. परंतु, आधुनिक काळात संपर्काची पद्धत पूर्णपणे बदलली आहे. आता एका सेकंदाचाही विलंब न लावता आपण जगाशी जोडू शकतो. जगातील कोणत्याही व्यक्तीशी संपर्क साधू शकतो, अगदी ती व्यक्ती ज्या अवस्थेत आहे तसे तिला समोर पाहू शकतो आणि संवाद साधू शकतो. आधुनिक युगातील प्रभावी संवाद साधन म्हणून सोशल मीडियाचा उपयोग होत आहे.संवादाविषयी डॉ. आर. पी. सक्सेना म्हणतात की, "संवाद ही एक संस्कृतीशी संबंधित प्रकिया आहे ज्यात संवाद साधणारा (संप्रेषक) यादृच्छिक मौखिक आणि अमौखिक चिन्हांचा वापर करून आपले विचार, भावना, दृष्टिकोण, माहिती श्रोत्याकडे संप्रेषित करीत असतो आणि त्याचप्रकारचा प्रतिसाद श्रोत्याकडून ग्रहण करीत असतो." म्हणजेच असे म्हणता येईल की, संवाद ही एक कला आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. यात एखादी व्यक्ती (संप्रेषक) आपले विचार, मनातल्या भावना, माहिती किंवा स्वतःचा दृष्टिकोन दुसऱ्या व्यक्तीपर्यंत पोहोचवते. हा संवाद केवळ शब्दांद्वारे (मौखिक) होतो असे नाही, तर कधीकधी चेहऱ्याचे हावभाव, हातांच्या हालचाली आणि शारीरिक हालचाली (अमौखिक) यांच्या माध्यमातूनही व्यक्त केला जातो. खरा संवाद तेव्हाच पूर्ण होतो, जेव्हा श्रोता ती माहिती व्यवस्थित समजून घेतो आणि त्यावर आपला प्रतिसाद देतो. थोडक्यात सांगायचे तर, एका व्यक्तीने व्यक्त होणे आणि दुसऱ्या व्यक्तीने ते समजून घेऊन त्याला दाद देणे, हीच संवादाची मुख्य प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया जितकी स्पष्ट आणि पारदर्शक असते, तितकेच मानवी संबंध अधिक दृढ होतात.

माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी आज फेसबुक, व्हॉट्सॲप आणि ट्विटर यांसारखी विविध साधने वापरली जात आहेत, ज्यामुळे जगभरातील लोकांशी सहज जोडले जाणे शक्य झाले आहे. या सोशल मीडियाच्या प्रवासाची खऱ्या अर्थाने सुरुवात १९९७ मध्ये 'सिक्स-डिग्रीज' (SIXDEGREES.COM) या प्लॅटफॉर्मपासून झाली. या वेबसाईटला जगातील पहिली अधिकृत 'सोशल नेटवर्किंग' साईट मानले जाते, कारण त्याकाळी अस्तित्वात असलेल्या मेसेजिंग सेवांच्या तुलनेत ही वेबसाईट पूर्णपणे वेगळी होती. येथे

वापरकर्ते निनावी न राहता स्वतःच्या खऱ्या ओळखीने प्रोफाईल तयार करू शकत होते आणि मित्रांची यादी जोडू शकत होते. या प्लॅटफॉर्मचे नाव 'सिक्स डिग्रीज ऑफ सेपरेशन' या संकल्पनेवरून ठेवले गेले होते, ज्याचा अर्थ असा की जगातील कोणतीही व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीशी जास्तीत जास्त सहा ओळखींच्या दुव्यांनी जोडलेली असते.

२००० च्या दशकाच्या सुरुवातीला सोशल मीडियाला खऱ्या अर्थाने व्यापक लोकप्रियता मिळण्यास सुरुवात झाली. यादरम्यान ब्लॅकप्लॅनेट (१९९९), फ्रेंडस्टर आणि मायस्पेस यांसारखे प्लॅटफॉर्म उदयास आले. त्यानंतर फेसबुक, यूट्यूब, ट्विटर आणि व्हॉट्सअॅप यांसारख्या विविध माध्यमांनी संवाद साधण्याच्या पद्धतीत मोठी क्रांती घडवून आणली. स्मार्टफोनच्या वाढत्या उपलब्धतेमुळे ही माध्यमे आज घराघरांत पोहोचली आहेत. "एका संशोधनानुसार, २०१५ पर्यंत इंटरनेट वापरकर्ते त्यांच्या ऑनलाइन वेळेपैकी साधारण २२% वेळ केवळ सोशल नेटवर्क्सवर घालवत होते. ही आकडेवारी दिवसेंदिवस वाढत असून २०२३ च्या आकडेवारीनुसार, जगभरातील सुमारे ४.७६ अब्ज लोक सोशल मीडियाचा वापर करत आहेत. हे प्रमाण जागतिक लोकसंख्येच्या तब्बल ५९% इतके असून, यावरून सोशल मीडियाचा आपल्या जीवनावरील प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो" . म्हणजेच सोशल मीडिया हे आपल्या लोकजीवनातील अत्यंत महत्त्वाचे माध्यम बनले आहे आणि संवाद साधण्याचे मुख्य माध्यम म्हणजे भाषा आहे. सुमारे अकरा कोटी लोकांची भाषा ही मराठी भाषा आहे. मराठी भाषा ही शैक्षणिक, साहित्यनिर्मिती, ज्ञाननिर्मिती आणि व्यवहाराच्या अशा कोणत्याही बाबतीत मागे नाही. मराठीच्या समकालीन वास्तवतेविषयी डॉ. नंदकुमार मोरे म्हणतात की, "एवढ्या मोठ्या लोकसंख्येची भाषा असल्याने, जागतिकीकरणानंतर अनेक उद्योगव्यवसायिकांना ती व्यवसायवृद्धीचे एक साधन वाटते आहे. त्यातून तिचे व्यावसायिक उपयोजना सुरू झाले आहे. सर्व प्रकारच्या माध्यमांमध्ये विविध उत्पादनांच्या मराठीमध्ये दिसणाऱ्या जाहिराती यांची साक्ष देतात. जगातील एक महत्त्वाची भाषा म्हणून मराठीने आपले श्रेष्ठत्व सिद्ध केलेले आहे. मराठीतून लिहिणारे ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्यापासून आजचे ढसाळ-चित्रे-नेमाडे यांनी तिचे थोरपण अधोरेखित केले आहे. मराठी भाषेतून शिक्षण घेतलेले अनेक लोक आज विविध क्षेत्रांत आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करत आहेत. या लोकांचा पाया मातृभाषेतील शिक्षणामुळे अधिक मजबूत झालेला आहे. संकल्पनांची स्पष्टता जशी मातृभाषेतून होते, तशी परकीय भाषेतून होऊ शकत नाही, हे मातृभाषेतून शिक्षण घेतलेल्या अनेकांच्या अनुभवांवरून सांगता येईल' ' .(पृ.८८,८९)

डॉ. ना. गो. कालेलकर यांनी 'लोकांचे' वैशिष्ट्य सांगताना म्हटले आहे की, "लोक म्हणजे एका वेगळ्या संस्कृतीचे दर्शन घडवणारा वर्ग." याचे विश्लेषण करताना मराठी बोलीविषयी डॉ. विद्या पाटील व डॉ. निशिगंधा व्यवहारे यांनी म्हटले आहे की, "'लोक' म्हणजे परंपरेने चालत आलेले जीवन जगणारा, स्वतःच्या सांस्कृतिक परंपरा जपणारा, निसर्गाच्या सान्निध्यात राहणारा, वंश, भाषा, व्यवसाय, धर्म यासारखे समान तत्त्वे असलेला लोकसमूह म्हणजे 'लोक' व या लोकांची बोलण्याची, दैनंदिन व्यवहाराची भाषा म्हणजेच लोकभाषा, बोलभाषा किंवा बोली होय." या लोकांच्या स्वाभाविक जगण्याप्रमाणेच त्यांची बोलभाषा स्वाभाविक व जिवंतपणाचा प्रत्यय देणारी असते.

आपल्या मराठीचेच उदाहरण घेतल्यास वऱ्हाडी, मराठवाडी, खानदेशी (अहिराणी) व कोकणी या मराठीच्या प्रमुख पोटभाषा किंवा बोली आहेत. याशिवाय पारंपरिक जीवन जगणाऱ्या वैशिष्ट्यपूर्ण लहान समाजगटाच्या, विविध जाती-जमातींच्या स्वतःच्या अशा बोलभाषा-बोली आहेत, ज्या मराठीपेक्षा बऱ्याच प्रमाणात वेगळ्या आहेत. या बोली त्या त्या जाती-जमातींच्या नावाने ओळखल्या जातात. जसे- बंजारा (लमाणी), भिल्ली, बेलदारी, वडारी, घिसाडी, कैकाडी, पारधी, पारशी (गोपाळ), खत्री, परदेशी, तावडी, पोवारी, कोल्हाटी, गोल्ला, मालवणी, आगरी, वाडवळी, सामवेदी इत्यादी. तसेच महाराष्ट्रातील आदिवासींच्याही कातकरी, कोकणा, कोरकू, कोलामी, गोंडी, ठाकरी, ढोरकोळी, परधानी, मावची, वारली इत्यादींच्या स्वतःच्या अशा बोलभाषा आहेत. आपल्या स्वतःच्या समाजांतर्गत या जाती-जमातींचे लोक आपल्या स्वतःच्या बोलभाषेत व्यवहार करतात. या जाती-जमाती महाराष्ट्राच्या ज्या प्रदेशात राहतात, त्या प्रदेशाची मराठी बोलभाषा त्यांना अवगत असल्याने इतरांशी ते प्रादेशिक बोलीतून व्यवहार करतात. प्रमाणभाषेविषयी ते म्हणतात की, "एकाच प्रदेशात सर्वत्र सारखी बोलली जाणारी भाषा ही त्या प्रदेशाची मुख्य भाषा मानली जाते. या भाषेला प्रादेशिक भाषा असेही म्हटले जाते. जसे – मराठी ही महाराष्ट्राची, कानडी ही कर्नाटकाची, बंगाली ही बंगाल प्रदेशाची. त्या त्या प्रदेशात राहणारे सर्व लोक विविध जाति-जमातीचे, धर्माचे, विनिमयासाठी, व्यवहारासाठी आपल्या प्रदेशाच्या मुख्य भाषेचाच वापर करतात." (पृ. ११, १२) भारतातील मुख्य २२ भाषांपैकी मराठी ही एक महत्त्वाची भाषा आहे.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

## II. आधुनिक काळातील संवाद आणि सोशल मीडियाचे स्वरूप:

**१. संवादाची संकल्पना** (Concept of Communication): संवाद म्हणजे केवळ बोलणे नव्हे, तर दोन व्यक्तींमधील विचारांची देवाणघेवाण आहे. २१ व्या शतकात तंत्रज्ञान, संगणक आणि इंटरनेटमुळे जग जवळ आले आहे. आज आपण जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात असलेल्या व्यक्तीशी संपर्क साधू शकतो.

**२. आधुनिक संवादाची माध्यमे**: केवळ लिखित मजकूर (TEXT) पाठवून संवाद पूर्ण होतोच असे नाही. त्यामध्ये प्रभावीपणा आणण्यासाठी ऑडिओ (आवाजाद्वारे भावना पोहोचवणे), व्हिडिओ (दृश्य स्वरूपात संवाद साधणे, जे अधिक परिणामकारक असते) आणि भाषा (संवादाचा सर्वात महत्त्वाचा आधार म्हणजे प्रभावी भाषा) ही माध्यमे महत्त्वाची ठरतात.

आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया हे केवळ गप्पा मारण्याचे साधन न राहता एक व्यापक जागतिक व्यासपीठ बनले आहे. या माध्यमामुळे व्यक्तीमधील सुप्त गुणांना आणि कला सादरीकरणाला नवीन दिशा मिळाली आहे. कोणत्याही कलाकाराला आपली कला सातासमुद्रापार पोहोचवण्यासाठी आता मोठ्या जाहिरातींची गरज उरलेली नाही. त्याचप्रमाणे, सामाजिक स्तरावर सोशल मीडिया परिवर्तनाचे साधन ठरत आहे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागातील अशिक्षित किंवा अल्पशिक्षित लोकांपर्यंत सरकारच्या विविध जनकल्याणकारी योजनांची माहिती अत्यंत सोप्या भाषेत आणि व्हिडिओच्या स्वरूपात पोहोचवणे यामुळे शक्य झाले आहे. केवळ माहितीच नव्हे, तर समाजाचे मानसिक बळ वाढवण्यासाठीही हे माध्यम मोलाची भूमिका बजावत आहे. महापुरुषांचे प्रेरणादायी विचार, थोर विचारवंतांची सुभाषिते आणि यशस्वी व्यक्तींचे अनुभव रील्स किंवा पोस्टच्या माध्यमातून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचत आहेत, ज्यामुळे सकारात्मक विचारांचा प्रसार होत आहे.

माहिती आणि शिक्षणाच्या क्षेत्रात तर सोशल मीडियाने क्रांतीच घडवून आणली आहे. घरबसल्या नवनवीन कौशल्ये शिकण्यासाठी, स्वयंपाकापासून ते तांत्रिक शिक्षणापर्यंतचे धडे घेण्यासाठी या माध्यमाचा उपयोग एका प्रभावी शैक्षणिक साधनासारखा केला जात आहे. थोडक्यात, माहितीचा वेगवान प्रसार आणि लोकशाहीकरण करण्यात सोशल मीडियाचा वाटा अत्यंत महत्त्वाचा आहे. यामध्ये 'व्लॉग्स' (VLOGS) हे दैनंदिन जीवनातील प्रवासाचे किंवा अनुभवांचे दर्शन घडवणारे एक प्रभावी माध्यम बनले आहे, ज्याद्वारे प्रेक्षकांना नवीन ठिकाणांची आणि जीवनशैलीची माहिती घरबसल्या मिळते. विशेषतः कोरोनासारख्या भीषण संकटकाळात, जेव्हा प्रत्यक्ष भेटीगाठींवर मर्यादा होत्या, तेव्हा सोशल मीडिया हेच माहिती मिळवण्याचे आणि एकमेकांशी जोडले जाण्याचे एकमेव महत्त्वाचे सूत्र ठरले. आजचे युग हे तंत्रज्ञानाचे युग असून सोशल मीडिया हा त्याचा अविभाज्य भाग बनला आहे. हे माध्यम एक मोठे व्यावसायिक व्यासपीठ म्हणूनही उदयाला आले आहे. 'बिझनेस रील्स' च्या माध्यमातून उद्योजक आपल्या मालाची जाहिरात करत आहेत, तर यूट्यूबसारख्या माध्यमातून अनेक युवक मोठ्या प्रमाणात आर्थिक उत्पन्न मिळवत आहेत. चांगल्या कामाची पावती म्हणून सिल्व्हर आणि गोल्ड प्ले बटणांसारखे जागतिक पुरस्कारही या क्षेत्रात दिले जात आहेत. मात्र, या माध्यमाचे जसे लाभ आहेत, तसेच त्याचे काही नकारात्मक पैलूही आहेत. सोशल मीडिया हे एक प्रकारे 'वरदान आणि शाप' अशा दुहेरी भूमिकेत आहे. एकीकडे आपण हव्या त्या व्यक्तीशी व्हिडिओ कॉलद्वारे समोरासमोर संवाद साधू शकतो, तर दुसरीकडे अनोळखी व्यक्तींकडून होणारी फसवणूक आणि सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वाढले आहे. त्यामुळे या तंत्रज्ञानाचा वापर करताना सजगता बाळगणे ही काळाची गरज आहे.

भाषा आणि जीवन या त्रैमासिकामध्ये प्रकाश परब आपल्या लेखात म्हणतात की, "गेल्या पाचशे वर्षांत जगातील सुमारे अर्ध्याहून अधिक ज्ञातभाषा विनावापरामुळे मृत पावल्या आणि शिल्लक राहिलेल्या भाषांपैकी अर्ध्याहून अधिक भाषा या शतका खेरपर्यंत नाहीशा होतील असे सांगितले जाते विशेष म्हणजे ज्या भाषा टिकून राहतील त्यांच्यापैकी फारच थोड्या सुरक्षित असतील मायकेल क्रॉस यांच्या मते तर २१ वे शतक संपेल तेव्हा पृथ्वीवर केवळ ६०० भाषा शिल्लक असतील म्हणजे सुमारे ९०% भाषा आपण गमावलेल्या असतील भाषेच्या जगण्या मरण्यापेक्षा लोकांना स्वतःच्या भवितव्याची चिंता अधिक असल्यामुळे जगाचे संस्कृतिक वैभव असलेल्या शेकडो भाषा नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत दर १४ मिनिटांनी एक भाषा जगाचा निरोप घेत आहे त्यामुळे हा भाषा सहार थांबवायचा कसा हा एक वैश्विक चिंतेचा प्रश्न बनला आहे" (पृ. ४६).या माहितीवरून असेच म्हणावे लागेल की, भाषेचा वापर विविध पद्धतीने वाढणे गरजेचे आहे. यासाठी 'भाषा आणि जीवन' याच त्रैमासिकात मनीषा जोशी "प्राचीन ज्ञान आणि आधुनिक तंत्रज्ञान" या लेखात म्हणतात की, "कला विज्ञान आणि संस्कृतीचे जतन करण्यासाठी सर जेम्स मेकॅनटोश यांनी १८०४ साली

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

स्थापन केलेल्या मुंबईच्या दि एशियाटिक सोसायटीने आधुनिक तंत्रज्ञानाची कास धरीत आपल्याकडील दुर्मिळ साहित्याचा ठेवा आता डीव्हीडींच्या स्वरूपात जतन केला आहे. तो दोन भागात निर्माण केला. साहित्याची नाळ युवा पिढीशी जोडण्यासाठी तंत्रज्ञान फायदेशीर ठरू लागले असून, ई-बुक्स, पुस्तकांच्या डीव्हीडी या माध्यमांकडे तरुण वर्ग आकर्षित होत आहे दोन्ही डीव्हीडी मिळवून वीस हजार पाने डिजिटल स्वरूपात रूपांतरित करण्यात आली असून सुमारे एक हजाराहून अधिक लेखांचा यात समावेश करण्यात आला आहे यावरून हा अक्षरांचा आणि विचारांचा खजिना किती मोठा असेल याची कल्पना येईल." (पृ. ६४).

या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात सोशल मीडिया माध्यमातून होणाऱ्या भाषेच्या वापराविषयी डॉ. रणधीर शिंदे 'जागतिकीकरण आणि आजचे मराठी साहित्य' याविषयी लिहितात की, "भविष्यात छापील स्वरूपातील पुस्तके वाचक वाचतील की नाही एवढा तंत्रज्ञानाचा पसारा विस्तारलेला आहे. ई-लिटरेचरचे प्रमाण वाढते आहे. वेगवेगळ्या प्रकारची पुस्तके आता ई स्वरूपात उपलब्ध होत आहेत. संगणकाच्या पी.सी. पासून लॅपटॉप, टॅबलेट व आज मोबाईल स्वरूपामध्ये ही साधने उपलब्ध आहेत. तसेच गेल्या काही वर्षात व्यक्तिगत व संस्थात्मक पातळीवरचे ब्लॉग सुरू झाले आहेत. या ब्लॉगवरूनही आपले विचार व भावना व्यक्त केल्या जात आहेत. या ब्लॉगवरूनच ललित साहित्यही प्रसिद्ध होऊ लागले आहे. कविता, कथा, कादंबऱ्या प्रसिद्ध होऊ लागल्या आहेत. हे ब्लॉग लिटरेचर अजून बाल्यावस्थेत आहे, भविष्यात मात्र याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे." (पृ. ६७).

## III. सारांश :

आजच्या २१ व्या शतकात माहिती-तंत्रज्ञानामुळे संवादाचे स्वरूप पूर्णतः बदलले आहे. पूर्वी प्रमाणभाषा ही केवळ पुस्तके आणि अधिकृत व्यवहारापुरती मर्यादित होती, तर बोलीभाषा फक्त घरापुरत्या किंवा ठराविक भौगोलिक क्षेत्रापुरत्या मर्यादित होत्या. परंतु, फेसबुक आणि इन्स्टाग्राम, रिल्ससारख्या समाजमाध्यमांनी या दोन्ही भाषांमधील भिंत आता पाडून टाकली आहे. यालाच आपण भाषेचे 'लोकशाहीकरण' म्हणू शकतो. आज आपण पाहतो की, फेसबुकवर पोस्ट लिहिताना लोक शुद्धलेखनाचे नियम न पाळता आपल्या मनातील विचार स्वतःच्या बोलीभाषेत बिनधास्तपणे मांडत आहेत. विशेषतः 'रिल्स'च्या माध्यमातून तर मोठी भाषिक क्रांती झाली आहे. कोल्हापुरी प्रदेशातील रांगडेपणा, वऱ्हाडी बोलीतील गोडवा, अहिराणी मधील लयबद्धता किंवा मालवणी बोलीतील मिश्किलपणा आज रिल्सच्या पडद्यावर जागतिक स्तरावर गाजत आहे. एकेकाळी ज्या बोलीभाषा बोलताना ग्रामीण भागातील तरुणांना संकोच वाटायचा, त्याच बोली आज डिजिटल युगात एक 'ब्रँड' बनल्या आहेत.

भाषेचा वापर वाढणे गरजेचे असते. जर आपण या तंत्रज्ञानाचा वापर 'उपक्रमशील' पद्धतीने केला—म्हणजेच, शेतीविषयक किंवा तांत्रिक माहिती त्या -त्या प्रादेशिक बोलींचा वापर त्या प्रदेशात उदा.वऱ्हाडी किंवा कोकणी बोलीभाषेत समजावून सांगणे, किंवा बोलीतील लोककला डिजिटल स्वरूपात मांडणे—तर मराठी भाषेचा ऱ्हास होण्याऐवजी ती अधिक समृद्ध होईल. थोडक्यात, प्रमाणभाषेची शिस्त आणि बोलीभाषेचा जिवंतपणा यांचा समाजमाध्यमांवरील समन्वय हीच आजच्या काळाची खरी गरज आहे. हा तंत्रस्नेही प्रवासच मराठी भाषेच्या उज्ज्वल भविष्याची खरी नांदी ठरणार आहे.

## संदर्भ ग्रंथसूची:

१) WIKIPEDIA HTTPS://EN.WIKIPEDIA.ORG
२) कोतापल्ले नागनाथ, दत्ता भगत (संपादक): 'जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य' ,सायन पब्लिकेशन्स प्रा.लि.पुणे ,प्रथमावृत्ती,२०१६पृ.८८,८९
३) पाटील विद्या,व्यवहारे निशिगंधा,'मराठी बोली (रूप आणि बोल)'कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती,२०१७ पृ.११,१२
४) परब प्रकाश, 'भाषा आणि जीवन' ,मराठी अभ्यास परिषद पत्रिका (त्रैमासिक),पुणे २०१४,पृ.१६
५) जोशी मनिषा,'भाषा आणि जीवन' मराठी अभ्यास परिषद पत्रिका (त्रैमासिक), पुणे २०१४,पृ.६४
६) कोतापल्ले नागनाथ, दत्ता भगत (संपादक): 'जागतिकीकरणानंतरचे मराठी साहित्य' ,सायन पब्लिकेशन्स प्रा.लि.पुणे ,प्रथमावृत्ती,२०१६पृ.६७